Historicity Research Journal
Volume 1 | Issue 2| Oct 2014 ISSN:- 2393-8900

Research Article

''सर धनजीशा कूपर यांचे जीवन व कार्य''

दम संतोष तुकाराम

इतिहास विभाग प्रमुख , एस.बी. आर. कॉलेज, म्हसवड.

सारांश :

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रात साताऱ्याने आपले एक वेगळेपण जपलं आहे. कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्वामुळेच हे वेगळपण साताऱ्याचे वैभव ठरले आहे. अशा कर्तृत्ववान व्यक्ती मधील सर धनजीशा कूपर हे एक होते. त्यांनी विसाव्या शतकाच्या पूर्वाधात सातारा जिल्ह्यातच नव्हे तर मुंबई इलाख्यात आपला राजकीय, सामाजिक व उद्यो क्षेत्रात दबदबा निर्माण केला होता. प्रस्तुत शोधनिबंधात सर धनजीशा कूपर यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तावना :

धनजीशा यांचे पूर्वचरित्र :-

धनजीश पर यांचा जन्म दि. २ जानेवारी १८७८ रोजी फिरोजबाई व बोमनजी या दांपत्याच्या पोटी एका गरीब पारशी टुंबात झाला. धनजीशा यांचे वडील सुतारकाम करुन आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवीत होते. घरची कसली ही अनुकूलता नसतानाही त्यांनी आपल्या मुलाला साताऱ्यात सरकारी शाळेत शिकवले स्वच्छ मराठी उच्चार व मराठी चालीरीतीशी ते शाळेत एकरुप होऊन गेले. कूपर यांचे फारसे शिक्षण झाले नव्हते त्यांची राहणी साधी होती. शिक्षणानंतर त्यांनी काही काळ पदमसी पेपर मिलमध्ये नोकरी केली याच पदमसीकडे महाराष्ट्रातील काही जिल्ह्याची अबकारी कंत्राटे होती त्याचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी धनजीशा कूपर यांना सातारा जिल्ह्यासाठी नियुक्त केले.[१] या काळात कष्टाने त्यांनी चार पैसे मिळवले. पुढे सन १९१२ मध्ये रावबहादुर काळे यांच्या आग्रहाने त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला.[२]

धनजीशा यांचा राजकीय प्रवास :-

सर धनजीशा हे सन १९२० ते १९३५ या काळात सातारा नगरपालिकेचे सभासद होते नंतर सन १९२३ - २४ ते १९३१-३२ या ाळात सातारचे नगराध्यक्ष होते त्यांनी आपल्या नगरध्यक्षपदाच्या काळातच सातारा शहाराच्या विकास कामाला चालना दिली. पुढे सन १९१७ - १८ मध्ये सत्यशोधक चळवळीचे ब्राम्हणेत्तर चळवळीत रुपांतर झाले व दि. १२ डिसेंबर १९२० रोजी पुण्यात जेधे मॅन्शनमध्ये बैठक होऊन ब्राम्हणेत्तर लीग (पक्ष) हा नवा पक्ष स्थापन झाला. या बैठकीला केशवराव विचारे, वालचंद कोठारी, कीर्तीवानराव निंबाळर, भास्करराव जाधव व धनजीशा कूपर इत्यादी नेते हजर होते. धनजीशा यांनी बैठकीत ब्राम्हणेत्तर पक्षाची आवश्यकता पटवून दिली याच बैठकीत एकूण सहा ठराव पास झाले होते.[३] व त्याच बैठकीत धनजीशा कूपर हे तह्हयात सभासद म्हणून निवडले गेले. तसेच डेक्कन ब्राम्हणेत्तर संघाचे सातारा जिल्हा सेक्रेटरी म्हणूनही ते निवडले गेले. पुढे डेक्कन ब्राम्हणेत्तर संघाचे १९२३ - २४ वर्षासाठीचे ार्यकारी मंडळ निवडण्यात आले त्यात धनजीशा हे उपाध्यक्ष होते.[४] थोडक्यात १९२० पूर्वीच सातारा जिल्ह्यात ब्राम्हणेत्तर कार्यकर्ता म्हणून धनजीशा कूपर नावारुपास आले होते.

सन १९१९ च्या कायद्यानुसार प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका नोव्हें. १९२० मध्ये घेण्यात आल्या या निवडणुकीत ब्राम्हणेत्तर पक्षाचे १३ उमेदवार विजयी झाले सातारा जिल्ह्यातून या पक्षाच्या वतीने पांडुरंगराव जाधव व धनजीशा कूपर विजयी झाले होते. सन १९२१

- २३ या काळात प्राथमिक शिक्षणाच्या योजने संबंधीच्या बिलावर ब्राम्हणेत्तर पक्षाच्या कूपर व इतर आमदारांनी सहभाग घेतला होता. सन १९२१ - २३ या काळात ते मुंबई प्रांतिकच्या प्रत्येक अधिवेशनात उपस्थित होते.

सातारा येथे दि. १६, १७, १८ डिसें. १९२२ रोजी ब्राम्हणेत्तर राजकीय परिषद व ब्राम्हणेत्तर सामाजिक परिषद भरली. धनजीशा □पर हे मंडळाचे अध्यक्ष होते त्यांनी ब्राम्हणेत्तर विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, वस्तीगृहे, नोकऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था व कायदेमंडळात जास्तीत जास्त संख्येने ब्राम्हणेत्तर असावेत यावर भर दिला होता. या परिषदेत छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूबद्दल दु:ख, असहकार चळवळीबद्दल नापसंती, स्वदेशी वस्तूचा वापर, अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी समानतेचे हक्क, लोकसंख्येच्या प्रमाणात नो□ऱ्या, मराठी व कानडी भाषा बोलणाऱ्यांना स्वतंत्र प्राप्त करुन देणे इ. ठराव पास झाले होते.[५]

सन १९२३ च्या मुंबईच्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीत ब्राम्हणेत्तर पक्षाचे एकूण ११ आमदार विजयी झाले त्यात सातारा जिल्ह्यातून भास्करराव जाधव व धनजीशा कूपर या दोघांचा समावेश होता. निवडून आल्यानंतर कूपर यांनी दुष्काळावर मात □रण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याचे ठरवले व सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात वर्षानुवर्षे दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे. म्हणून त्यांनी ब्रिटिश सरकारकडे सन १९२६ मध्ये राणंद तलावासाठी पाठपुराव करुन तातडीने तलाव बांधून घेतला त्यामुळे पावसाचे पाणी आडवून दुष्काळी भाग सुजलाम सुफलाम करण्याचा प्रयत्न कूपर यांनी केलेला दिसून येतो.[६] पण पुढे सन १९२६ च्या निवडणुकीत सातारा जिल्ह्यात कूपरचा गट, भास्करराव जाधवांचा गट, आचरेकर व रामचंद्र शिंदे यांचा गट, भाऊराव पाटील व केशवराव विचारे यांचा □ट असे एकूण चार गट पाडले. यावेळी धनजीशा कूपर पराभूत झाले. पण ब्राम्हणेत्तर पक्षाचे १३ सदस्य मुंबई प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीत विजयी झाले. सन १९३० च्या निवडणुकीत धनजीशा कूपर पुन्हा एकदा मुंबई कायदेमंडळात निवडणुकीत विजयी झाले. सन १९३५ - ३६ या काळात गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळाचे सभासद या नात्याने त्यांनी अर्थ व महसूल खात्याचा कारभार पाहून त्यांनी मुंबई इलाख्याचा अर्थसंकल्प सभागृहात सादर केला होता व या अर्थ संकल्पात शेतमालाच्या किंमती झपाटयाने उतरल्याने सर्व जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ३३ टक्के सुट द्यावी असे त्यांनी सूचविले हाते.[७]

सन १९३७ च्या निवडणुकीत पंडित जवाहरलाल नेहरुनी काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी सातारा जिल्ह्याचा झंझावती दौरा □ला. त्यामुळे संपूर्ण जिल्हा काँग्रेसमय होऊन सर्वत्र काँग्रेसची लाट आली. अशा वावटळीत सुध्दा कूपर ३६,७०० मते घेवून निवडुन आले. या निवडणुकीत ब्राम्हणेत्तर पक्षाचे ९ आमदार निवडुन आले. यावेळी सन १९३५ च्या कायद्याने गव्हर्नरला दिलेले खास अधिकार व स्वच्छेधिकारच वापर याबाबत निश्चित आश्वासन मिळाल्याशिवाय सत्ता स्विकारायची नाही असे काँग्रेसने ठरविल्याने तत्कालीन गव्हर्नर मिचेल हर्बट रुडल्फ नॅचबूल यांनी बिगर काँग्रेसी मंत्रीमंडळ नियुक्त केले. मुंबई इलाख्यात सर धनजीशा (पंतप्रधान), सिध्दप्पा कांबळी (शिक्षणखाते) जमनादास मेहता (महसूल व अर्थमंत्री) तर हुसेन अली व एस. रहिमतुल्ला (स्थानिक स्वराज्य) असे संमिश्र मंत्री मंडळ दि. १/४/१९३७ रोजी सत्तेवर आले हे मंत्री मंडळ संमिश्र असल्याने त्याचा उल्लेख कूपर कमळी मंत्रीमंडळ असा होत असे. सत्तेवर आल्यानंतर त्यांनी रत्नागिरी येथे १३ वर्षापासून स्थानबध्द असलेल्या वि.दा. सावरकरांची दि. १८ मे १९३७ रोजी बिनशर्त सुटका केली. तसेच त्यांनी मुख्यमंत्राचा पगार ४,०००/- रुपये व मंत्र्याचा पगार ३,५०० /- वार्षि□ □रण्याचा निर्णय घेतला. त्यांनी या काळात कऱ्हाड येथील कृष्णा पुलासारखी चिरपरिणाम करणारी कामगिरी केली.[८]

नंतर बाळासाहेब खेर यांनी कूपर मंत्रीमंडळाविरुध्द अविश्वासाचा ठराव गव्हर्नरकडे पाठविला. अविश्वास ठराव येण्या अगोदरच दि. १७/७/१९३७ रोजी कूपर मंत्रीमंडळाने राजीनामा दिला व दि. १९ जुलै १९३७ रोजी काँग्रेस प□ाने मंत्रीमंडळ बनवले.[९] जिल्ह्याच्या राजकारणात धनजीशा यांचा गट कूपर पार्टी या नावाने ओळखला जात असे कूपर पार्टीने जिल्ह्यातील बहुतेक सर्व नगरपालिका, डिस्ट्रिट लोकल बोर्ड, जिल्हा स्कुल बोर्ड इ. संस्थावर वर्चस्व गाजविले. कूपर पार्टीच्या राजकारणाने सातारा जिल्ह्याच्या □मी□ भागात तरुण नेतृत्वाची नवी फळी निर्माण केली. कूपर यांच्या राजकीय वर्चस्वाला सन १९३९ नंतर ओहोटी लागली. त्यांचे सर्व सह□ारी □ाँ□ेसमध्ये दा□ल झाले. सातारा जिल्ह्यात जिल्हा लोकल बोर्डाचे राजकारण हे कूपरच्या सत्ताकारणामुळे एक वादग्रस्त □द्रविषय होऊन बसले होते. [१०] त्यासाठी यशवंतरावांनी काँग्रेसमधील नेत्यांना बरोबर घेऊन सातारा जिल्हा लोकल बोर्ड कूपर यांच्या ताब्यातून काँग्रेसकडे आणले व बाळासाहेब देसाई यांना लोकल बोर्डाचे अध्यक्ष नेमले अशा पध्दतीने कूपरशाहीचा अस्त झाला.

धनजीशा व सत्यशोधक समाज ३

ब्राम्हणेत्तर पक्षाच्या राजकारणात असलेले धनजीशा हे मुळचे सत्यशोधकी पिंडाचे नव्हते हे जरी जितके खरे असले तरी त्यांनी जिल्ह्यातील सत्यशोधक समाज सांभाळला त्याला बळ दिले व हा विचार त्यांनी स्वत:च्या सोयीसाठी कर्तव्य बुध्दीने स्विकारला. जन जागरणासाठी सत्यशोधकी जलसे हे एक प्रभावी माध्यम होते. त्याला प्रेरणा राजर्षी शाहू महाराजांनी दिली एवढेच नव्हेतर आर्थि□ बळ व

सर्वंकष प्रोत्साहन दिले. दरवर्षी सोमथळच्या वास्तव्यात या जलशाच्या मैफली झडत असत. सन १९२२ ला राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर हे जलशे आर्थिक अडचणीत सापडले. त्यावेळी सर धनजीशा यांनी सातारा जिल्ह्यातील जोत्याजीराव फाळके पाटील यांच्या जलशाच्या वार्षिक खर्चाची जबाबदारी स्विकारली. सन १९२२ ते १९३३ या काळात धनजीशा यांनी जलशा पार्टीला आर्थिक मदत केली. [११] हा जलसा चालू ठेवण्यात धनजीशा यांचा मोठा हातभार होता.

प्रबोधनकारांचे सत्यशोधकी बाण्याचे लेखन हे प्रबोधन मधून प्रसिध्द होत होते त्यासाठी जर धनजीशा यांनी त्यांना कारखाना परिसरात एक छापखाना काढून दिला होता. तसेच जिल्हा स्कूल बोर्डाचे अध्यक्ष असताना त्यांनी बहुजन समाजातील शिक्षक तयार करुन त्यांना प्रोत्साहन दिले व त्यामध्ये त्यांनी बहुजन समाजातील गुणी शिक्षकांना काम करण्याची संधी दिली. [१२] थोडक्यात सर धनजीशा यांनी सत्यशोधक चळवळीला केलेले सहकार्य व त्यातील त्यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग हा अत्यंत महत्वाचा होता.

धनजीशा एक उद्योजक ३

सातारा जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीला चालना देण्यात किर्लोस्कर, ओगले यांच्याप्रमाणेच कूपर यांचे योगदान महत्वाचे ठरते. धनजीशा यांनी सन १९२२ साली गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मदतीने सातारा रोड पाडळी येथे 'सातारा इंडस्ट्रिअल वर्क्स' या नावाच्या कारखान्याची सुरुवात नांगर तयार करण्यापासून केली. कारखान्यामध्ये नां□रा बरोबरच, ऊसाचे चरक, शेंगा फोडण्याचे यंत्र, मोटेची चाके, रहाट व तेलघाणे यांची निर्मिती करण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांची लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्याशी स्पर्धा सुरु झाली. साडेबारा रुपये हा नांगराचा उत्पादन खर्च असताना कूपरनेही किर्लोस्करांप्रमाणे शंभर - सव्वाशे रुपये किंमतीला नांगर विकणे ही बाब कर्मवीर भाऊराव पाटलांना आवडली नाही. [१३] शेतकऱ्यांचे कैवारी म्हणवून घेणाऱ्या कूपरनेही जास्तीत जास्त उत्पादन खर्चाच्या तिप्पट किंमतीला नांगर विकावेत असे कर्मवीर आण्णांचे मत होते पण कूपर म्हणे. एवढा मोठा कारखाना आम्ही □शाला काढला? एकाचे हजार होत नाहीत तो धंदा करायचा तरी कशाला? शेवटी किर्लोस्कर यांनी नांगराची किंमत शंभर सव्वाशेवरुन छत्तीस रुपयांपर्यंत आणली पण याचमुळे आण्णा आणि कूपर यांच्यात दुरावा निर्माण झाला. यातूनच समज गैरसमज वाढत गेले. अनेकांनी याला खतपाणी घातले. याचा परिणाम म्हणून आण्णा बंदुक घेऊन कूपरांना मारण्यासाठी धावून गेले. आण्णांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनी प्रबोधनकार ठाकऱ्यांच्याकडे धाव घेतली. तेही त्यावेळी कूपर यांच्या कारखान्यात नोकरीस होते आणि आण्णांचे निकटचे स्नेही होते. त्यांनी आण्णाच्या हातून बंदुक खेचून घेतली आणि हा कटू प्रसंग टाळला. [१४] □र्मवीर आण्णांशी झालेला कडाक्याचा वाद विसरुन त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या कार्यालाही थोडाफार हातभार लावला. त्यांनी मोटारीचे नवीन इंजिन तयार करुन सन १९२६ साली महाबळेश्वर येथे गव्हर्नरला त्यचे प्रात्यक्षिक दाखवले होते. त्या काळातील तो देशातील पहिला प्रयोग होता. औद्योगिक क्षेत्रातील ऑटोमोबाईल युगाची ती नांदीच ठरली आहे. [१५] सन १९३२ मध्ये डंकन स्टॅटन ॲण्ड कंपनीशी करार करण्यात आला व सातारा इंडस्ट्रिअल वर्सचे रुपांतर 'हिंदूस्थान इंजिनिअरिंग ॲण्ड इम्प्लीमेंट ' □पनीत झाले. त्यावेळी हिंदूस्थानात परदेशीय डिझेल इंजिनाना खूप मागणी होती ही गोष्ट लक्षात घेऊन कारखान्याने इंग्रजी धर्तीची डिझेल इंजिने तयार करण्यास सुरुवात केली. पुढे डंकन स्टॅटन ॲण्ड □पनीने आपली भागीदारी काढून घेतली व कारखाना कूपर यांच्या मालकीचा झाला. [१६]

दि. २२ मे १९४० साली शेठ वालचंद हिराचंद यांनी या कारखान्यात मोठया प्रमाणावर भांडवल गुंतवून या कारखान्यांची '□पर इंजिनिअरिंग लिमिटेड' या नावाने स्थापना झाली. [१७] दुसरे महायुध्द सुरु झाल्याकारणाने देशी उद्योगांना तेजी येऊ लागली होती या परिस्थितीचा फायदा घेऊन सन १९४० ते १९४६ या काळात कंपनीने मोठया प्रमाणावर आधुनिक पध्दतीने उत्पादन वाढविण्याकरीता निरनिराळया प्रकारची सामुग्री आणली. विशेषत: कारखान्याच्या फाऊंड्रीमध्ये मिहनाईट धातूची निर्मीती होत होती. नंतर अमेरिकेतील मिहनाईट मेटल(धातू) कार्पोरेशन या कंपनीकडून लोखंडाचे ओतकाम करण्याचे हक्क मिळविले. मशिनशॉपमध्ये नवीन यंत्रसामग्री आणून उत्पादनाच्या दृष्टीने नवी रचना करण्यात आली. दि. १४ ऑगस्ट १९४४ ला नरीमन या एकुलत्या एक मुलाचे आकस्मित निधन झाले त्या धक्यातून धनजीशा कधीच सावरु शकले नाहीत त्यानंतर ते सार्वजनिक जीवनातून जवळ जवळ निवृत्त झाले होते. पुढे दि. २९ जुलै १९४७ मध्ये सर धनजीशा यांच्या निधनाने त्यांची भागीदारी संपुष्टात आली व हा कारखाना वालचंद उद्योग समुहापैकी एक मोठा घटक होवून बसला. औद्योगिक क्षेत्रात नित्य नवीन करण्याची त्यांची ओढ होती. भारतामध्ये डिझेल इंजिन निर्मिती करणारे पहिले भारतीय □ारखानदार म्हणून धनजीशांचे नाव घेतले जाते.

समारोप ३

सर धनजीशा कूपर हे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील सातारा जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनातील एक बडे प्रस्थ होते ते धुरंधर राजकारणी होते. उद्योग.व्यवसायात त्यांनी नेत्रदीपक प्रगती केली. ब्रिटिशांशी सतत एकनीष्ट राहून त्यानी आपले राजकारण, उद्योगधंदे यशस्वीपणे हाताळले. यशवंतराव चव्हाणांच्या पुढाकाराने काँग्रेसने कूपर पार्टीचा पराभव करुन जिल्ह्यातील सर्व सत्तास्थाने काँग्रेसच्या वर्चस्वाखाली आणली. सन १९४४ साली धनजीशा कूपर यांच्या एकुलता एका मुलाचे निधन झाले. त्या धक्यातून ते कधीच सावरु शकले नाहीत त्यानंतर ते सार्वजनिक जीवनातून जवळ जवळ निवृत्त झाले होते. दि. २९ जुलै १९४७ रोजी धनजीशा कूपर यांचे निधन झाले. अशा प्रकारे एका सर्वसामान्य पारशी कुटूंबात जन्मलेल्या धनजीशा यांनी सामाजिक, राजकीय व औद्योगिक क्षेत्रात सातारा जिल्ह्यातच नव्हेतर मुंबई इलाख्यात आपला दबदबा निर्माण केला होता.

संदर्भ सूची

१. गुजर जयवंत, सहस्त्रकातील वेगळा पारशी सर धनजीशा कूपर, चंद्रकला प्रकाशन, पुणे - २००३ पा.नं. १७३
२. कित्ता, पा.नं.६२
३. विजयी मराठा, दि. ११ डिसेंबर १९२०
४. कित्ता, दि. ५ जानेवारी १९२३
५. कित्ता, दि. २५ डिसेंबर १९२२
६. दै. सकाळ, दि. ९ जुलै २०१२ पा.नं.४
७. गुजर जयवंत, उपरोक्त, पा.नं. १६२
८. गोखले पु.पा., जागृत सातारा, लोकसेवा संघ, सातारा - १९६६ पा.नं. १६३
९. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉम्युलर प्रकाशन, मुंबई - २०१२ पा.नं.३२५
१०. चव्हाण यशवंतराव, कृष्णाकांठ (आत्मचरित्र), रोहन प्रकाशन, मुंबई २०१२ पा.नं. २२०
११. गुजर जयवंत, जगावेगळा सत्यशोधक गुरुवर्य केशवराव विचारे, विचारे फार्मस, इंदगाव - २००४ पा.नं.८१
१२. कित्ता, पा.नं.७४
१३. ठाकरे के.सी, माझी जीवनगाथा, सौमय्या पब्लिकेशन मुंबई - १९७३ पा.नं.३०४
१४. कित्ता, पा.नं. ३०६
१५. दै. लोकमत, दि. १५ मे २००८ पा.नं.२२
१६. सातारा शहर नगरपालिका शतसंवत्सरिक महोत्सवी अंक १८५४ पा.नं. ९३
१७. पाटणे संभाजीराव, साताऱ्याचे कोहिनूर, संस्कृती प्रकाशन, पुणे - २०११ पा.नं.१६